# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

# Savitribai Phule Pune University

(formerly University of Pune)

**विद्यापीठ अधिकार मंडळाच्या निवडणुकीसाठी प्राचार्य/अध्यापक/विद्यापीठ अध्यापक/महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्थातील विभागप्रमुख यांच्या नामनिर्देशन अर्ज भरण्यासंदर्भात स्पष्टीकरण.**

**निवडणूक सूचना संदर्भ :**

१. जा. क्र. साफुपुविनि/२८(२)(ण)/३२९ दिनांक २६.१२.२०१७ अन्वये प्राचार्य गटातून १० प्राचार्यांची अधिसभा सदस्य म्हणून निवडणूक.

२. जा. क्र. साफुपुविनि/२८(२)(द)/३२८ दिनांक २६.१२.२०१७ अन्वये अध्यापक गटातून १० अध्यापकांची अधिसभा सदस्य म्हणून निवडणूक.

३. जा. क्र. साफुपुविनि/२८(२)(ध)/३२७ दिनांक २६.१२.२०१७ अन्वये विद्यापीठ अध्यापक गटातून ३ विद्यापीठ अध्यापकांची अधिसभा सदस्य म्हणून निवडणूक.

४. जा. क्र. साफुपुविनि/३२(३)(छ)/३२६ दिनांक २६.१२.२०१७ अन्वये अध्यापक गटातून प्रत्येक विद्याशाखेच्या २ अध्यापकांची विद्यापरिषद सदस्य म्हणून निवडणूक.

५. जा. क्र. साफुपुविनि/४०(२)(ग)/३२५ दिनांक २६.१२.२०१७ अन्वये प्रत्येक अभ्यासमंडळावर ३ महाविद्यालयाचे, मान्यताप्राप्त परिसंस्थेतील विभागप्रमुखांची अभ्यासमंडळ सदस्य म्हणून निवडणूक.

वरील निवडणुकींसाठी नामनिर्देशन अर्ज भरण्यासंदर्भात अनेक इच्छूक उमेदवारांकडून वेगवेगळया माहितींच्या संदर्भात विचारणा करण्यात येत आहे. म्हणून वरील निवडणुकींसाठी उमेदवारी अर्ज भरण्यासंदर्भात खालीलप्रमाणे स्पष्टीकरण देण्यात येत आहे.

(१) उमेदवारी अर्ज हे विद्यापीठाच्या election.unipune.ac.in या संकेत स्थळावर उपलब्ध असून ते डाऊनलोड करुन घ्यावे. या नामनिर्देशन अर्जातील शेवटचे पान केवळ नोंदणीकृत पदवीधरांच्या अधिसभा सदस्य म्हणून निवडणुकीसाठी विहित करण्यात आले आहे. ते भरण्याची व नामनिर्देशन अर्जासोबत सादर करण्याची आवश्यकता नाही.

उमेदवारी अर्जातील पान क्र. २ हे केवळ वरील निवडणुकीसाठी मागासवर्गीयांच्या प्रवर्गाकरीता राखीव असलेल्या जागांकरिता नामनिर्देशन अर्ज भरु इच्छिणाऱ्या उमेदवारांनीच भरावयाचे आहे व त्यामध्ये नमूद केल्याप्रमाणे उमेदवाराने स्वतःचे जातीचे प्रमाणपत्र उमेदवारी अर्जासोबत जोडावे.

खुल्या प्रवर्गातील उमेदवारांनी केवळ पान क्र. १ भरुन सादर करावे.

(२) उमेदवारी अर्जाचे शुल्क ऑनलाईन पध्दतीने किंवा बँक चलनाद्वारे भरता येईल, या संदर्भातील सविस्तर सूचना विद्यापीठाच्या election.unipune.ac.in या संकेत स्थळावर "Pay Nomination Fee" या लिंकवर उपलब्ध आहेत.

(३) उमेदवारी अर्ज भरताना, इच्छूक उमेदवारांना मदत व्हावी म्हणून **'उमेदवारी अर्जाचे नमूने'** जाहिर प्रकटन जा. क्र. साफुपुविनि/३४९ दिनांक २९.१२.२०१७ अन्वये विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आले आहे.

1/1/18

संदर्भ क्र. : साफुपुविनि/
दिनांक १०७/०१/२०१८

(डॉ. अरविंद दिगंबर शाळिग्राम)
प्रभारी कुलसचिव

**प्रत** : सर्व संबंधित उमेदवार.

D:\Election 2017\Teachers, PG Teachers, Principal\Notifiacation.docx